महाभारतातील अलौकिक चरित्रे : खंड २

# योगेश्वर श्रीकृष्ण

## (गुणवैशिष्ट्ये आणि श्रीकृष्णावरील आक्षेपांचे खंडन)

मराठी (Marathi)


**लेखक**


**श्री. दुर्गेश जयवंत परुळकर**



**सनातन संस्था**


सप्टेंबर २०२३ पर्यंत सनातनच्या ३६२ ग्रंथांच्या मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्ल्याळम्, बंगाली, ओडिया, आसामी, गुरुमुखी, क्रोएशियन, जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच आणि नेपाळी या १७ भाषांत ९४ लाख ३५ सहस्र प्रती !

# लेखक श्री. दुर्गेश परुळकर यांचा अल्प परिचय



**१. पूर्ण नाव आणि पत्ता :** श्री. दुर्गेश जयवंत परुळकर, 'बी २०१', श्री शिव-समर्थ बिल्डिंग, आजदे पाडा, आजदे गाव, माऊली बंगल्याजवळ, कल्याण रस्ता, डोंबिवली (पूर्व) ४२१ २०३.

**भ्रमणभाष क्र. :** ९८३३१ ०६८१२

**२. जन्मदिनांक :** २१.७.१९५७ (आषाढ वद्य अष्टमी, शके १८७९)

**३. विविध क्षेत्रांत कार्यरत :** श्री. परुळकर वर्ष १९७७ पासून शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रांत कार्यरत आहेत. त्यांनी आजवर विविध विषयांवर २,५०० पेक्षा अधिक व्याख्याने दिली आहेत, तसेच त्यांचे अनेक लेख विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले आहेत.

**४. ग्रंथसंपदा**

**अ. डॉ. सच्चिदानंद शेवडे यांच्या समवेत लिहिलेले ४ ग्रंथ :** 'शिवरायांची युद्धनीती', 'पानिपतचा रणसंग्राम', 'गोवा मुक्तीसंग्राम' आणि 'ज्ञात-अज्ञात सावरकर'.

**आ. स्वतंत्रपणे लिहिलेले १३ ग्रंथ :** 'सावरकरांची राजनीती', 'क्रांतिवेदीवरील समिधा', 'क्रांतिकारक बाबाराव सावरकर', 'सावरकरांचा मार्सेलीस पराक्रम', 'कश्मीर – उत्कर्ष आणि संघर्ष', 'तेजस्वी जीवन', 'छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा गांधी', 'धगधगत्या समिधा', '१९६५ चा विजय', 'धर्मनिष्ठ सावरकर', 'भगवद्गीता पद्यानुवाद', 'निष्काम कर्मयोगी भीष्म' आणि 'योगेश्वर श्रीकृष्ण'.

**५. राष्ट्रीय कार्यातील सहभाग**

अ. 'स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, दादर, मुंबई' याचे भूतपूर्व कार्यकारीणी सदस्य

आ. डोंबिवली, तसेच मुंबई येथील ‘स्वा. सावरकर अभ्यास मंडळ’ यांचे भूतपूर्व कार्यवाह

इ. ‘हिंदु जनजागृती समिती’च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अनेक आंदोलनांत सहभाग

६. **आध्यात्मिक विशेषता :** श्री. दुर्गेश परुळकर यांनी ६१ टक्के आध्यात्मिक पातळी (टीप) गाठली असल्याचे १७.६.२०२२ या दिवशी गोवा येथे झालेल्या ‘दशम् अखिल भारतीय हिंदु राष्ट्र अधिवेशना’त हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु डॉ. चारुदत्त पिंगळे यांनी घोषित केले.

टीप – आध्यात्मिक पातळी : व्यक्तीमधील सत्त्वगुणाच्या प्रमाणावर तिची आध्यात्मिक पातळी (स्तर) अवलंबून असते. सत्त्वगुणाचे प्रमाण जितके जास्त, तितकी आध्यात्मिक पातळी जास्त असते. ‘सर्वसाधारण व्यक्तीची आध्यात्मिक पातळी २० टक्के असते, तर मोक्षाला गेलेल्या व्यक्तीची आध्यात्मिक पातळी १०० टक्के असते’, असे गृहित धरून पातळी टक्क्यांमध्ये सांगितली आहे. F (SOH-DuP-Pari)

## श्रीकृष्णाची अनन्यसाधारण शिकवण म्हणजे त्याने सांगितलेली ‘भगवद्गीता’ !

‘श्रीराम आणि श्रीकृष्ण हे दोघे आपल्या राष्ट्राचे सेनापती, सारथी आणि श्रेष्ठ अधिपती आहेत. त्यांनी दिलेले पौरुषयुक्त धडे आपण पुन्हा गिरवूया आणि आपल्या हिंदु राष्ट्रास पुन्हा अजिंक्य आणि विजिगीषू (शत्रूला जिंकण्याची प्रबळ इच्छा असणारे) करूया. श्रीकृष्णाने केले बहुत आणि सांगितलेही बहुत; पण त्या सर्व कृत्यांत जे त्याचे अवतारकृत्य म्हणून त्याने केले, ते अनन्यसाधारण कृत्य म्हणजे कंसवध म्हणजे दुष्टवध ! त्याच्या सर्व सांगीत (शिकवणीत) जी विशिष्ट, अनन्यसाधारण शिकवण त्याने दिली ती म्हणजे ‘भगवद्गीता !’ – **स्वा. सावरकर** (वर्ष १९२८) (ISav1 + PR 1A ) F (ISav + PR 13 + PR 14)

# ग्रंथाची अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


प्रकरण १. श्रीकृष्ण ९

१ अ. श्रीकृष्ण कोण आहे ? ९

१ आ. श्रीकृष्णाचे अवतरण (श्रीकृष्णाचा जन्म) १४

१ इ. श्रीकृष्णाने अवतार घेण्याच्या वेळची सामाजिक परिस्थिती १६

१ ई. श्रीकृष्णाचा यादववंश १८

१ उ. कंसाचा वध २४

१ ऊ. श्रीकृष्णाने विद्यार्थीदशेत असलेल्या पांडवांच्या हिताकडे लक्ष देणे २९

१ ए. जरासंधाचा पराभव ३०

१ ऐ. श्रीकृष्ण-रुक्मिणी विवाह ३९

१ ओ. नरकासुराचा वध ४२

१ औ. श्रीकृष्णाने गुरु सांदीपनि ऋषी यांना दिलेली अनोखी गुरुदक्षिणा ! ४३

१ अं. राधा कोण आहे ? ४७

१ क. आदर्श युगपुरुष श्रीकृष्ण ! ४८

१ ख. जगद्‌गुरु श्रीकृष्ण ! ५७

१ ग. श्रीकृष्णाची काही लोकोत्तर गुणवैशिष्ट्ये ५८

१ घ. पांडवांचे श्रद्धास्थान असलेला श्रीकृष्ण ! ७८

१ च. शाल्वाचा वध ८१

१ छ. पाशवी सत्तेच्या स्थैर्यासाठी ‘संजय शिष्टाई’ ! ८३

१ ज. धर्माधिष्ठित राजसत्तेच्या स्थापनेसाठी ‘श्रीकृष्ण शिष्टाई’ ! ८६

१ झ. श्रीकृष्णावरील आक्षेप आणि त्यांचे खंडन १०२

**प्रकरण २. भक्तत्सल श्रीकृष्ण आणि भक्त भीष्म ! १**१५

२ अ. शरशय्येवरील पितामह भीष्मांनी केलेली श्रीकृष्णस्तुती ! ११५

२ आ. भगवान श्रीकृष्णाने केलेले पितामह भीष्मांचे गुणवर्णन १३९

२ इ. भगवान श्रीकृष्णाने शरशय्येवर असलेल्या पितामह भीष्मांना पांडवांना उपदेश करण्यास सांगणे १४०

२ ई. भगवंत आणि भक्त असे उत्कट नाते असलेले भगवान श्रीकृष्ण आणि पितामह भीष्म ! १४३

卐 **परिशिष्ट १ : महिमा ‘भीष्म’पर्वाचा ।** १४६

卐 **परिशिष्ट २ : महाभारत सार ।** १४७

卐 **लेखकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन** १४८

**टीप** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## प्रकाशकाची भूमिका !

‘ग्रंथाचे लेखक श्री. दुर्गेश परुळकर हे एक तत्त्वचिंतक, साहित्यिक, सावरकरवादी, राष्ट्रप्रेमी आणि धर्मप्रेमी आहेत. ‘अशा विभूतीमत्वाचा ग्रंथ प्रकाशित करणे’, हे धर्मकार्यच असून, ते करतांना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. श्री. परुळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून शब्दबद्ध झालेल्या लिखाणाचा ओज तसाच टिकून रहाण्यासाठी आम्ही लिखाणाची भाषा, व्याकरण इत्यादी फारसे पालटलेले नाही. काही ठिकाणी लेखन स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.’ – **प्रकाशक**

# मनोगत

'श्रीकृष्ण हे विश्वातील महान व्यक्तीमत्त्व आहे ! शिशुपालाचे १०० अपराध भरेपर्यंत संयम बाळगणारा, द्वारकेचा राणा असूनही अत्यंत गरीब असलेला भक्त सुदाम्याकडील पोहे खाणारा आणि सख्यभक्ती करणाऱ्या अर्जुनाच्या रथाचे सारथ्य करून त्याचे अनेक वेळा प्राण वाचवणारा श्रीकृष्ण आहे ! श्रीकृष्ण हा आदर्श पुत्र, आदर्श बंधू, आदर्श पती, आदर्श पिता आणि आदर्श मित्र आहे. तो अन्यायाचा नायनाट करून धर्मसंस्थापना करणारा आहे. तो उत्तम वक्ता आणि राजदूत आहे. तो तत्त्ववेत्ता आहे, तसाच जगद्गुरुही आहे. तो 'श्रीमद्भगवद्गीते'चा कर्ता आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी फाशी ठोठावलेले अनेक क्रांतीकारक गीतेतील श्लोक म्हणत हसत हसत वधस्तंभाकडे चालत गेले. गीतेतील तत्त्वज्ञान आजही मनामनांत नवचैतन्य उत्पन्न करते.

अशा भगवान श्रीकृष्णाची अनेक गुणवैशिष्ट्ये प्रस्तुत ग्रंथात दिली आहेत. ती वाचून वाचकांची श्रीकृष्णावरील श्रद्धा आणि भक्ती वृद्धींगत होईल. यामुळे त्यांच्या उपासनेला बळ मिळेल. अनेक संतमहात्मे, भविष्यवेत्ते आदींनी सांगितल्यानुसार लवकरच महाभीषण आपत्काळ (उदा. महायुद्ध, महापूर) ओढवणार आहे. अशा आपत्तींमध्ये आपल्याला कोण वाचवू शकतो, तर केवळ भगवंतच ! श्रीकृष्णाने गीतेमध्ये 'न मे भक्तः प्रणश्यति।' (अर्थ : माझ्या भक्तांचा नाश होणार नाही), असे वचन भक्तांना दिले आहे. येणाऱ्या भीषण आपत्काळात आपले रक्षण होण्यासाठी आपण साधना आणि भक्ती करायला हवी. आपत्काळात पांडवांचे सर्व प्रकारे रक्षण करणाऱ्या श्रीकृष्णाची भक्ती वाढण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त ठरेल.


सध्या बुद्धीप्रामाण्यवादी, नास्तिक आदी हिंदूंचे धर्मग्रंथ, देवता आणि महापुरुष यांवर टीका करून हिंदूंचा बुद्धीभेद करतात. अशा टीकांचा योग्य तो प्रतिवाद न केल्याने हिंदूंची श्रद्धा डळमळीत होते, तसेच धर्महानीही होते. 'अयोग्य टीकांचा प्रतिवाद करणे', हे काळानुसार आवश्यक असे धर्मपालनच आहे. याच हेतूने या ग्रंथात 'श्रीकृष्णावरील आक्षेप आणि

त्यांचे खंडन’ दिले आहे. प्रत्येकाने यांचे अभ्यासपूर्वक मनन करावे.

प्रस्तुत ग्रंथमालिकेच्या पहिल्या खंडात ‘पितामह भीष्म’ यांचे चरित्र कथन केले आहे. आता या दुसऱ्या खंडाद्वारे ‘भगवान श्रीकृष्णा’चे चरित्र प्रकाशित करतांना आम्हाला आनंद होत आहे. हे ललित चरित्र नसून विवेचनात्मक चरित्र आहे. ‘या चरित्राद्वारे वाचकांना श्रीकृष्णाचे माहात्म्य समजून त्यांच्याकडून श्रीकृष्णाची भक्ती अधिक उत्कटतेने होवो’, ही भगवान श्रीकृष्णाच्याच चरणी प्रार्थना !’ F (PR 14GV)

**– प्रकाशक**

## ‘धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राची स्थापना’ होण्यासाठी प्रयत्न करणे, हीच भगवान श्रीकृष्णाची खरी उपासना !



‘कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ।’ म्हणजे ‘जगद्गुरु कृष्णाला वंदन करतो.’ सर्व देवतांमध्ये फक्त श्रीकृष्णालाच ‘जगद्गुरु’ संबोधले आहे. याचे कारण हे की, त्याने कर्मयोग, भक्तीयोग, ज्ञानयोग इत्यादी योगमार्ग शिकवलेले आहेत. श्रीकृष्णाने श्रीमद्भगवद्गीतेच्या माध्यमातून ‘राष्ट्र आणि धर्म यांच्या संदर्भात कसा विचार करावा?’, हेसुद्धा शिकवले. त्याने द्वापरयुगात धर्मराज्याच्या स्थापनेसाठी अर्जुनाकडून ‘क्षात्रधर्म साधना’ करून घेतली. सध्या समष्टीच्या कल्याणासाठी धर्मसंस्थापना, म्हणजे ‘धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राची स्थापना’ होण्यासाठी प्रयत्न करणे, हीच भगवान श्रीकृष्णाची खरी उपासना आहे. हिंदु राष्ट्राची स्थापना श्रीकृष्णाच्या आशीर्वादाविना होणे शक्य नाही. यासाठी साधना करून श्रीकृष्णाचा आशीर्वाद मिळवा आणि हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी प्रयत्न करा !’

**– सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले, संस्थापक, सनातन संस्था** (१८.७.२०१४)